कुरार पोलीस ठाणे, मुंबई
दिनांक - १४/१०/२०२६

# मोटार स्कुटर चोरी करणाऱ्या चोरास अटक करून एकूण ११ मोटर स्कूटर हस्तगत करण्यात कुरार पोलीस ठाणेस यश.

कुरार पोलीस ठाणेच्या हद्दीमध्ये दिनांक ०३/१०/२०२६ रोजी होंडा कंपनीची डिओ मोटर स्कुटर क्र. MH 02 DX 8340 ही शुभ्रा पार्क बिल्डींग जवळ, पठाणवाडी, कुरारगांव, मालाड (पू) मुंबई या ठिकाणाहुन चोरी झाल्या बाबत फिर्याद प्राप्त झाल्याने गून्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाच्या अनुषंगाने गुप्तबातमीदारामार्फत खात्रीलायक माहिती मिळाल्याने पोलीस पथकाने सदर परीसरात त्यांचेवर पाळत ठेवुन नमूद गून्हयातील मोटार स्कुटर चोरी करणाऱ्या आरोपीतास शिताफीने ताब्यात घेतले. त्यास पोलीस ठाणेस आणुन त्याचेकडे केलेल्या सखोल व कौशल्यपुर्ण तपासात त्याने सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली. त्यास नमूद गून्हयात दिनांक ०९/१०/२०२६ रोजी अटक करण्यात आले .

नमूद गून्हयातील अटक आरोपी नामे अमित दिलीप सोनी, वय १९ वर्षे याचेकडे केलेल्या तपासात, तो व त्याचा मित्र मिळुन मुंबई शहर व मुंबई शहराबाहेर त्यांनी अनेक मोटर स्कूटर चोरी केल्याची तपासात दिसून आले. आरोपीत वज्रेश्वरी, तुंगारेश्वर,वसई येथे जात - येत असताना लोकांनी रस्त्यावर पार्क केलेल्या मोटार स्कुटर, ज्या मोटर स्कूटर कोणत्याही चावीने चालू होतात अशा मोटर स्कूटर आरोपीतांच्या जवळ असलेल्या जुन्या चावीने **(मास्टर की)** त्या चालू करून चोरी करत होते. नमुद अटक आरोपीताने त्याच्या मित्रासह मिळुन कुरार पोलीस ठाणे व आजूबाजुच्या परिसरातील एकुण ११ मोटार स्कुटर चोरी केल्याचे सांगितले आहे. त्या निवेदन पंचनाम्यात जप्त करण्यात आल्या आहेत.

**<u>अटक आरोपीताचे नाव व पत्ता:-</u>**

१) अमित दिलीप सोनी, वय १९ वर्षे, काम - डिलीव्हरी बॉय, रा.ठी. - महात्मा फुले चाळ, भीमनगर, कुरारगांव, मालाड पुर्व, मुंबई.

२) गून्हयातील दुसरा आरोपीत विधीसंघर्षीत असून त्याचे वरती बाल अधिनियमा प्रमाणे कारवाईची तजवीज आहे.

**<u>अटक आरोपीताकडून गून्हयाच्या तपासात हस्तगत करण्यात आलेल्या ११ मोटर स्कूटरची माहिती खालील प्रमाणे:-</u>**

१) **कुरार पोलीस ठाणे,मुंबई** गू.र.क १०६८/२०२६ कलम ३०३(२) बी.एन.एस २०२३
MH02DX8340 होन्डा कंपनीची DIO

२) **कुरार पोलीस ठाणे,मुंबई** गू.र.क ९५३/२०२६ कलम ३०३(२) बी.एन.एस २०२३
MH 47 AC 9613 होन्डा कंपनीची DIO

३) **कुरार पोलीस ठाणे,मुंबई** गू.र.क ५७२/२०२६ कलम ३०३(२) बी.एन.एस २०२३
MH02DY4032 होन्डा कंपनीची Activa

४) **मेघवाडी पोलीस ठाणे,मुंबई** गू.र.क ४३१/२०२६ कलम ३०३(२) बी.एन.एस २०२३
MH01EG0114 होन्डा कंपनीची DIO

५) **अचोले पोलीस ठाणे,मिराभांईदर** गू.र.क ८८०/२०२६ कलम ३०३(२) बी.एन.एस २०२३
MH48CA1578 होन्डा कंपनीची Activa 6 G

**<u>खालील मोटर स्कुटरबाबत तपास चालु आहे :-</u>**

६) MH47V7096 होन्डा कंपनीची Activa 4 G
७) MH50K0983 होन्डा कंपनीची Activa 4 G
८) MH48AH8373 होन्डा कंपनीची Activa 125
९) MH01BC7931 सुझुकी कंपनीची Access 125
१०) MH05BT8797 हिरो कंपनीची Mestro
११) MH01CB7322होन्डा कंपनीची Dio

सदर गुन्हयाचा तपास मा. श्री. शशिकुमार मिना, अप्पर पोलीस आयुक्त, उत्तर प्रा. विभाग मुंबई, मा. श्री गजानन राजमाने, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ- १२, मुंबई, मा. कैलास बर्वे, सपोआ समतानगर विभाग, मुंबई, यांच्या मार्गदर्शनाखाली कुरार पोलीस ठाणेचे वपोनि सुशिलकुमार गायकवाड, पोनि(गुन्हे) भारत दराडे, गुन्हे प्रकटीकरण अधिकारी पोउनि ज्ञानेश्वर जाधव, गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोह/तानाजी मोरे, पोह/अविनाश गुजर, पोशि/बबन राठोड, पोशि/संतोष फडतरे, पोशि/ श्रीकांत गोरे अशा पोलीस पथकाने अतिशय कौशल्यपुर्ण मुंबई शहर व मुंबई शहरा बाहेरील गुन्हे उघडकीस आणले आहे. पोलीस पथकाची कामगिरी कौतुकास्पद व अभिनंदनीय आहे.